**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

Vol - VI Issue - VII JULY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# लवासा शहर या पर्यटन स्थळाचा विशेष अभ्यास

**अभिमन्यु वसंतराव जाधव**

संशोधक विद्यार्थी, भूगोल विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.

***सारांश :*** *लवासा शहर हे भारतातील पहिले नियोजित थंड हवेचे ठिकाण आहे. जिथे नागरिक निसर्गाच्या सानिध्यात राहून काम करु शकतात. या स्थळामुळे तेथील स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी व आर्थिक लाभ होतो.*


***बिज संज्ञा :*** *पर्यटकांना रोजगार, सेवा-सुविधा, पर्यटन स्थळे*

**प्रस्तावना :**

पर्यटन क्षेत्रात देशातच नव्हे तर जागतिक नकाशावर महाराष्ट्रातील अनेक पर्यटन स्थळे नोंदविली गेल्याने महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांना हजारो देशी-विदेशी पर्यटक दररोज भेटी देत असतात. त्यापैकी सौंदर्याची अनोखी खाण असणारे पश्चिम घाटातील सुंदरशहर म्हणून लौकिक पावलेले व नियोजीत सुंदर, थंड हवेचे गिरीस्थान म्हणून प्रसिध्दीस आलेले लवासा शहर हे पर्यटकांच्या आकर्षणातील महत्वाचे पर्यटन स्थळ ठरले आहे. या पर्यटन स्थळाची ओळख ख-या अर्थाने सातासमुद्रापार झाली .त्यातील लवासा शहर हे मानवनिर्मित असून धरतीवरील स्वर्गरुपाची अनूभूती देतो. हे पर्यटनस्थळ सह्याद्री पर्वत रांगेतील उंच डोंगर रांगेत असून या ठिकाणी दिवसेंदिवस पर्यटनस्थळी पर्यटकांच्या संख्येत वाढ होत चाललेली आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

लवासा शहर या नियोजित शहराचे भौगोलिक स्थान १८°२४' ते ३४°८७' उत्तर अक्षवृत्त ते ७३°३०' ते २३°७७' पूर्व रेखावृत्तांच्या दरम्यान येतो. लवासा शहराचे एकूण क्षेत्रफळ १०११.७१ हेक्टर आहे. तसेच लवासा शहराच्या पुर्वेस पुणे शहर, पश्चिमेस मुंबई, उत्तरेस लोणावळा तर दक्षिणेस महाबळेश्वर ही महत्वाची शहरे आहेत.




**उद्दीष्टये:**

१.पर्यटनस्थळी असलेल्या सेवा-सुविधेविषयी अभ्यास करणे.

२.अभ्यास क्षेत्रा पर्यटन विकासामुळे पर्यावरणीय समस्या उद्भवतात त्याची कारणे अभ्यासणे.

**गृहीतके :**

१.पर्यटन स्थळी असलेल्या सेवासूविधेमुळे पर्यटकांच्या संख्येत बदल होते.

२.पर्यटकांचा वाढता ओघ त्यामुळे प्रदुषणात वाढ होते.

**शोध पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या प्राथमिक व द्वितीय सामुग्रीचा वापर केलेला आहे. तसेच सांख्यिकीय पद्धतीचा वापर करुन व संगणकावरील माहिती द्वारा घेतलेल्या माहिती व काही शोध पत्रांचा उपयोग करुन माहिती मिळवली आहे.

**लवासा शहरातील पर्यटकांचे आकर्षण :**

**१. शहर रचना :**

लवासा शहरातील संदर रंगी-बेरंगी व आकर्षक गगन चुंबी इमारती हॉटेल्स अन्य इमारती व वारसगाव तलावा काठची शहर रचना या शहराची १२,५०० एकर क्षेत्रावर ती नियोजन करुननियोजित लवासा शहराची निर्मिती पाच टप्प्यात करण्याचे ठरवले असून हे नियोजित शहर दासवे, मुगाव, धामनहोळ, गडले आणि साखरी-वडवली असे स्थान ठिकाणे निश्चित केलेली आहे. ज्यामध्ये कायमस्वरुपी २.४ लाख लोकसंख्या निवास करु शकेल तर ८०,००० लोकांना रोजेगार उपलब्ध होणार आहे. म्हणुन पर्यटक दररोज हजारो पर्यटक भटी देतात.

**२. टेमघर धरण :**

लवासा शहर शेजारीच म्हणजे दासवे गावाशेजारी मुठा नदीवर टेमघर हे मध्यम स्वरुपाचे धरण आहे.जे मार्च १९९७ ते मे २०१० साली बांधण्यात आले गुरुत्वाकर्षण शक्तीच्या तत्वावर बांधलेले हे मातीचे धरण असून वारसगाव धरणापासून केवळ २२ कि.मी. अंतरावर असून पर्यटकांना टेमघर धरणातून पाण्याचा पडणारा प्रवाह मन-मोहित करत असतो.

**३. वारसगाव धरण :**

वीर पासालकर नावाने ओळखले जाणारे वारसगाव धरण लवासा शेजारी असून पर्यटक या धरणामध्ये जलक्रिडचा आनंद मिळवण्यासाठी आवर्जून भेटी देत असतात. हे धरण मुळा नदीवर पानशेत धरणाशेजारीच असून धरणातील पाणी पाणशेत धरणात सोडले जाते. या ठिकाणी असलेला धबधबा पाहण्यासाठी पावसाळा ऋतूत पर्यटकांची गर्दी होत जल क्रिडेसाठी हे धरण सुरक्षित व सर्वोत्तम आहे.

**४. हंगामी धबधबे :**

लवासा शहरालगत लहान-मोठे ८ धबधबे नावाजलेले ३ धबधबे आहेत त्याठिकाणी ३७मी. उंचीचा पडलवाडी धबधबा, २५मी. उंचीचा वारसगाव धबधबा,१५ मी. उंचीचा दासवे धबधबा इत्यादी धबधबे असून पावसाळा ऋतूमध्ये या धबधब्यांच्या ठिकाणी पडणा-या पाण्याचे पांढरे शुभ्र सरी पाहून पर्यटकांची त्याठिकाणी गर्दी होते.

**५. जलक्रिडा केंद्र (लेकशोर वाटर स्पोर्ट ):**

लवासा शहरातील वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन केंद्र म्हणून दासवे तलावा शेजारील जलक्रिडा केंद्राकडे पाहीले जाते. या ठिकाणी अनेक साहसी जलक्रिडांचा आनंद घेता येतो. ज्यामध्ये जेट स्कींग, गो-कायाकिंग, बोट, कटिंग-एडजे जेट्टी, वॉटर व्हॉली बॉल, पायाने चालवण्याच्या बोटी, बंपर बोटी मध्ये जलक्रिडा करता येतो. अतीवेगाने चालणा-या लक्झरी क्रुझच्या माध्यामातून पर्यतीय प्रदेशाच्या सभोवताली भ्रमंती करता येते. दासवे तलाव काठच्या किना-यावर जागतिक दर्जा असणा-या या जलक्रिडेचा आनंद घेणे लवासा शहर उभारणीमुळे शक्य झालेले आहे.

**समस्या :**

१. लवासा शहरातील मालाच्या किंमतीत वाढ झाल्याने पर्यटकांच्या आर्थिक समस्या उद्भवतात.
२. लवासा शहरातील वाढत्या पर्यटकांमुळे पर्यावरणीय प्रदुषणात वाढ होते.
३. अभ्यास क्षेत्रास महाराष्ट्र शासनाने मोटार वाहन म्हणजे बसेच मध्ये वाढ केलेली नाही. त्यामुळे पर्यटकांना वेळेत प्रवास करणे आवघड जाते.
४. सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था उपलब्ध नाही.
५. पर्यटकांना स्वस्थ खाण-पाण व्यवस्था उपलब्ध नसल्याने पर्यटकांचा ओघ कमी होत आहे.

**उपाय योजना:**

१. अभ्यास क्षेत्रातील असलेल्या सेवा-सुविधेमधील मालाच्या किंमती कमी करणे.
२. या पर्यटन स्थळास भेटी देण्यास येणा-या पर्यटकांना धुम्रपानापासून दूर ठेवणे गरजेचे आहे.
३. अभ्यास क्षेत्रास वाहतूक सुविधा पुरविणे हे शहर खुले असले तरी येणा-या पर्यटकांना त्रास होऊ नये त्या करिता वाहतूक सुविधा पुरविणे
४. लवासा शहरास अन्य ठिकाठिकाणी पर्यटकांना शौचालयाची व्यवस्था करुन देणे.
५. लवासा शहरातील कामगार लोकांच्या पगारीमध्ये वाढ करने गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

१. लवासा शहरातील सेवा-सुविधा व मालाच्या किंमतीत वाढ केल्यामुळे पर्यटकांना त्या ठिकाणी पाहिजे तसे पर्यटन करता येत नसल्याने पर्यटक त्रस्त होतो.
२. अभ्यास क्षेत्रातील शहर रचना व जलतरण, खेळाडू हे त्या ठिकाणचे वैशिष्ट्ये असल्याने पर्यटक या ठिकाणी वाढतात. तर योग्य दरात सेवा पुरविल्यास पर्यटकांच्या संख्येत वाढ होते व त्या पर्यटकांना धूम्रपान मध्यपान सारखे वस्तू घेऊन येणा-या पर्यटकांची मेन गेट वरती कसून चौकशी केल्यास अन्य पर्यटकांना कसल्याच प्रकारचा त्रास होत नाही.असे असल्यास पर्यटन स्थळाच्या विकासात वाढ होते.

**संदर्भ सूची :**

१. शूभरा टंडन (नवेंबंर २.२०१४ ) लवासा शहर, (पर्यावरणीय अभ्यास) पृ.क्र.१४
२. Lavasa Guide Book (20 Jan.2014)vol.02 pp.88
३. Temghar Dam (Wikipedia)
४. शूभरा टंडन (नवेंबंर २.२०१४)लवासा शहर, (पर्यावरणीय अभ्यास) पृ.क्र.८
५. Lasava Guide book (20Jan.2014) vol.02 pp.88
६. The draft red herring prospectus June 30,2014 lavasa corporation limited pp.16
७. www.hellotravel.com/india/lakeshore-watersport.in lavasa,about lakeshore watersports article.